## प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)
(०२३५८) २८२३८७

अंक ५५/२०१७ | दिनांक ११/०७/२०१७ | कालावधी ५ दिवस


**डॉ. सुभाष चव्हाण,** विभाग प्रमुख, कृषिविद्या विभाग ९४२२४३१०६७

**डॉ. ज्ञानेश्वर जगताप,** नोडल ऑफिसर, कृषिविद्या विभाग ९४०३९८८१४३

**प्रा. विरेश चव्हाण,** तांत्रिक अधिकारी, कृषिविद्या विभाग ९४२२०६५३४४


| १मागील हवामान सारांश दि. ०७/०७/२०१७ ते ११/०७/२०१७ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१६ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

हवामान पूर्वानुमान (१२/०७/२०१७ सकाळी ८:३० पासून १६/०७/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)

| हवामानांचे घटक | : | १२/०७ | १३/०७ | १४/०७ | १५/०७ | १६/०७ |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | १५ | १५ | २५ | २५ | ३० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३० |
| किमान तापमान (अं.से) | : | २७ | २७ | २७ | २७ | २७ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ८ | ७ | ८ | ७ | ८ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ८९ | ९० | ९१ | ९१ | ९१ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ७५ | ७९ | ७९ | ८३ | ८९ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ०११ | ०१२ | ०११ | ०१४ | ०१६ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक १२ ते १६ जूलै, २०१७ पर्यंत पावसाची शक्यता आहे. दिनांक १२ ते १६ जूलै, २०१७ पर्यंत अवकाश मेघाच्छादित राहिल. दिनाकं १२ ते १६ जूलै, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ११ ते १६ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | —— | • भात क्षेत्रातील बांधांची बाध.बंदीस्ती करावी.<br>• भात पिकाची पुनर्लागण (लावणी) करण्याकरिता खरीप हंगामात (पावसाळी) १२ ते १५ सें. मी. उंचीची पाच ते सहा पाने फुटलेली २२ ते २५ दिवसांची रोपे लावणीसाठी वापरावीत.<br>• चिखळणीच्या वेळी ४० किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाया प्रती हेक्टर खताची मात्रा द्यावी.<br>• भाताच्या रोपांची लावणी २० X १५ सें. मी. अंतर ठेवून करावी. लावणी सरळ आणि उथळ (२.५ ते ३.५ सें. मी. खोल) करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडात तीन रोपे लावावीत संकरित भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे.<br>• बांधावरील खेकडयांचा बंदोबस्त करावा त्यासाठी १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पा.मि. ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम किंवा पा.मि. कार्बारिल भूकटी १०० ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळया तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बीळे उकरली जातील अशा बिळात परत अमिष वापरावे. |
| **चिकू** | वाढीची अवस्था | • चिकूवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये (मेटालॅक्झिल ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के) या संयुक्त बुरशीनाशकाचे ०.२ टक्के (२० ग्रॅम/१० लिटर पाणी) द्रावण संपूर्ण झाडावर फवारावे.<br>• मोठया आकाराची काढणीची फळे तयार झाली असून ती काढणीच्या अवस्थेत आहेत. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर अतूल चिकू झेल्याच्या सहाय्याने  काढावीत. |
| **नारळ/ सुपारी** | —— | • नारळावरील इरिओफाईड कोळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निमॅझॉल ७.५ मि.ली. किंवा इकोनिम प्लस १० मि.ली. समप्रमाणात पाण्यात मिसळून मुळाद्वारे द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसांपर्यंत नारळ काढू नयेत. तसेच नारळाला १ टक्का निमॅझॉल ४ मि.ली. प्रति लिटर पाण्यातून नारळाच्या झाडावर पडेल अशी फवारणी करावी. किंवा इरिओफाईड स्मॅश (आझाडायरेक्टीन ०.०३ टक्के अधिक सुक्ष्मअन्नद्रव्ये) चे २५० मि.ली. २० लिटर पाण्यात मिसळून प्रति माडास बुंध्याभोवती जमिनीत द्यावे.<br>• नारळावरील गेंडा भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी माड साफ करून सर्वात वरील पानांच्या बेचक्यात २ टक्के मिथील पॅराथिऑन पावडर ५० ग्रॅम, ५० ग्रॅम वाळू यांचे समप्रमाणात मिश्रण करून भरावे. बागेमध्ये शेणखताच्या खडयात अळयांना मारण्यासाठी ५० टक्के कार्बारिल भुकटी ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावी.<br>• नारळाला गरजेनुसार पाणी द्यावे.<br>• नारळ लागवडीसाठी ७.५ X ७.५ मीटर अंतरावर १ X १ X १ मीटर आकाराचे, आणि सुपारीसाठी २.७ X २.७ मीटर अंतरावर ०.६ X ०.६ X ०.६ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि ३–४ घमेले शेणखत, २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि वाळवीच्या नियंत्रणासाठी १०० ग्रॅ. फॉलीडॉल पावडर किंवा ५० ग्रॅम दाणेदार क्लोरोफायरीफॉस या मिश्रणाने भरून ठेवावेत. |
| **भाजीपाला आणि फळबाग रोपवाटीका** | – | • वेलवर्गीय भाज्यांना काठीचा आधार द्यावा. भाजीपाला क्षेत्रातील तणांचा बंदोबस्त करावा. तसेच प्रती गुंठ क्षेत्रास ७२० ते ८५० ग्रॅम युरिया खताचा एक तृतीयांश हप्ता द्यावा अणि मंडपाची व्यवस्था करावी. .<br>• आंबा कलमे तयार करण्यासाठी आवश्यक आंबा बाठयाची पेरणी करावी.<br>• रोपवाटिकेतील पाण्याचा निचरा होणेसाठी चर खोदून घ्यावेत.<br>• आंबा बाठा कलमे १५ जूलै पूर्वी बांधून पूर्ण करावीत म्हणजे कलमे जगण्याचे प्रमाण चांगले राहिल. |
| **दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन** | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडूपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फिनीशर खाद्य द्यावे.<br>• गाई, म्हैस आणि शेळया यांना पायलाग प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |